# जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह पुणे यांचे कार्यालय,

## सी विंग, दुसरा मजला, पी.एम.टी. कमर्शियल बिल्डींग शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे

E-Mail ID:- addcollrulcpune @gmail.com फोन नंबर:- ०२०२४४६४३३४

*****************************************************************************

**वाचा-** १) अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समुह पुणे यांच्याकडील आदेश क्र. युएलसी/D-१२/टी.डी.एल.वाय.टी/बीर/१९९० दि. १९/०४/१९९१

२) शासनाचे नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक नाजक २०१८/प्र.क्र.५१/नाजकधा-१ दिनांक ०१/०८/२०१९

३) शासनाच्या नगर विकास विभागाकडील पत्र क्र.नाजक २०१८/प्र.क्र.८३/नाजकधा-२/एसआर/२३/२०१९, दिनांक ०९/०९/२०१९.

४) या कार्यालयाकडील पत्र क्र.युएलसी/क-२०/बी-३/४९३,दिनांक ६/१२/२०१९.

५) या कार्यालयाकडील पत्र क्र.युएलसी/क-२०/का ३/एस आर/३२/५ दि. ०२/०१/२०२०

६) द्वारका को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी तर्फे मे सिद्धीविनायक कन्स्ट्रक्शन, श्री. गणेश मोहनराव काकडे यांचे दिनांक २९/०१/२०२० रोजीचे अर्ज व सहपत्र.

*****************************************************************************

क्र. युएलसी/का-३/क- २०/एसआर/२३/८२ /2020
दि. १६/०२/२०२०

**विषय:-** **मौजे तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे येथील जुना स.नं. ११/२ए (नवीन स.नं. १०/२ए) चा भूखंड क्र. ७२ ते ८७ यांसी ३२५९.५० चौ.मी.या मिळकतीचे विकसनकामी, शासन निर्णय क्रमांक नाजक २०१८/प्र.क्र.५१/नाजकधा-१, दिनांक ०१/०८/२०१९ नुसार होणारे अधिमूल्य व दंडात्मक रक्कम कळविणेबाबत. (योजना क्रमांकB-३) (योजनाधारक श्रीमती. अंजनाबाई गणपत टकले)**

## आदेश

ज्याअर्थी अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र. युएलसी/D-१२/टी.डी.एल.वाय.टी/बीर/१९९० दि. १९/०४/१९९१ रोजीच्या आदेशान्वये २५३७३.६४ चौ. मी .क्षेत्राकरिता विशेष भूखंड योजनेखाली सूट देणेत आली आहे.

ज्याअर्थी द्वारका को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी तर्फे मे सिद्धीविनायक कन्स्ट्रक्शन तर्फे श्री. गणेश मोहनराव काकडे यांचा दि. २८/०८/२०१९ रोजीचे निवेदनाद्वारे **केलेल्या विनंतीच्या** अनुषंगाने शासनाने **मौजे तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे येथील जुना स.नं. ११/२ए (नवीन स.नं. १०/२ए) भागशः भूखंड क्र. ७२ ते ८७ मधील क्षेत्र ३२५९.५० चौ.मी. या मिळकतीचे विकसनकामी** शासन निर्णय दिनांक ०१/०८/२०१९ नुसार परवानगी देणेबाबत या कार्यालयास आदेशित केले होते.

ज्याअर्थी शासन निर्णय दि. ०१/०८/२०१९ नुसार नाजकधा अधिनियमाचे कलम २० अन्वये विशेष भूखंड योजनेस सूट देण्यात आलेल्या क्षेत्रापैकी भूखंड क्र. ७२ ते ८७ मधील क्षेत्र ३२५९.५० चौ.मी. क्षेत्रास शासन निर्णय दि. ०१/०८/२०१९ मधील मुद्दा क्र. १अ नुसार रक्कम रु. १६,८१,९०२/- व दि. १९/०४/१९९३ ते ३१/०१/२०२० पर्यंत दंडात्मक मुदतवाढीकरीता रक्कम रु. ४६,९९,५०३/- अशी एकूण ६३,८१,४०५/- शासकीय कोषागारात जमा करणेबाबत अर्जदारास या कार्यालयाने दि. ०२/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले.



Scanned with CamScanner

ज्याअर्थी अर्जदाराने रक्कम र ६३,८१,४०५/- इतकी रक्कम दिनांक २९/०१/२०२० रोजी शासकीय कोषागारात जमा केलेचे मूळ चलनाची प्रत या कार्यालयाकडे सादर केलेली आहे.

त्याअर्थी शासन निर्णय क्रमांक नाजक २०१८/प्र.क्र.५१/नाजकधा-१ दिनांक ०१/०८/२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील अटी व शर्तीस अधिन राहून या कार्यालयाकडील आदेश क्र. युएलसी/D-१२/टी.डी.एल.वाय.टी/बीर/१९९० दि. १९/०४/१९९१ रोजीच्या आदेशान्वये २५३७३.६४ चौ. मी .क्षेत्रापैकी मौजे तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे येथील जुना स.नं. ११/२ए (नवीन स.नं. १०/२ए) भागशः भूखंड क्र. ७२ ते ८७ मधील क्षेत्र ३२५९.५० चौ.मी. क्षेत्राचा विकास करण्याकरिता खालीलप्रमाणे अटी व शर्तीस अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१) नाजकधा कलम २० अन्वये सूट देण्यात आलेले एकूण क्षेत्रापैकी भूखंड क्र. ७२ ते ८७ मधील क्षेत्र ३२५९.५० चौ.मी क्षेत्राचा विकास करावयाचा आहे त्याप्रमाणात एकरकमी अधिमूल्य जमा करण्यात आले असलेने अशा क्षेत्राचा विकास करण्यास परवानगी देण्यात येत आहे. आणि केवळ तेवढयाच जमिनीच्या इतर हक्कातील नोंदी कमी करण्यात याव्यात उर्वरित क्षेत्रासाठी त्या- त्या वेळच्या शिघ्र सिध्द गणकानुसार अधिमूल्य वसूल केलेनंतरच अधिमूल्याची रक्कम जमा करण्याच्या प्रमाणात अशा जमिनीच्या इतर हक्कातील नोंदी कमी करण्यात येतील

२) अर्जदाराने या कार्यालयाने परिगणित केलेले अधिमुल्य शासकीय कोषागारात भरणा केल्याबाबतच्या चलनाची मूळ प्रत दि. २९/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास सादर केलेली आहे. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणातील क्षेत्रासाठी जमिनीच्या अधिकार अभिलेखात घेण्यात आलेली **नाजकधा कलम २० खालील क्षेत्र व हस्तांतरणास प्रतिबंध** ही नोंद कमी करण्यात यावी. तथापी अशा क्षेत्राच्या लघु / मध्यम आकारमानाच्या सदनिका बांधणे आपेक्षित असल्याने **८० चौ. मी. चटई क्षेत्राच्या मर्यादेत सदनिका वांधण्यासाठीचे क्षेत्र अशी नोंद घेण्यात यावी.**

३) नाजकधा १९७६चे कलम २० अन्वये सूट दिलेल्या जमीनीचा विकास करताना अशा जमीनीवर असणारी विविध आरक्षणे संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या मंजूर विकास आराखडयानुसार तसेच विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकसित करणे योजनाधारक/ विकसकावर प्रचलित कार्यपध्दतीनुसार बंधनकारक राहतील.

४) सदर योजनेचा लाभ घेताना गृहबांधणी /तळेगाव दाभाडे भूखंड विकास योजना/ अन्य योजनामधून शासनास यापूर्वी हस्तांतरीत झालेले बांधिव क्षेत्र वा शासनदेय क्षेत्र परत देता येणार नाही.

५) नाजकधा १९७६ चे कलम २० अन्वये पारीत केलेल्या आदेशातील विकासासाठी उपलब्ध होणा-या क्षेत्राच्या विकसनास परवानगी देताना संबंधित नियोजन प्राधिकरणांचे प्रमुख यांनी या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कमाल ८० चौ.मी. आकारमानाच्या सदनिका बांधण्याची अट बांधकाम परवानगी प्रमाणपत्रामध्ये स्पष्ट नमुद करण्याबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी, आणि अशा इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र (ओ.सी) देताना त्याबाबतची खातरजमा करावी.

६) सदर जमीनी विकसित करण्यासाठी परवानगी देणेबाबत अधिमूल्याची रक्कम निश्चित करणेत आलेली असली तरी शासन जमा केलेल्या रकमेबाबत आक्षेप निघाल्यास शासनास भरावयाची अधिमूल्याची अंतिम रक्कम निश्चित केल्यास फरकाची रक्कम अर्जदार / खरेदीदार यांना शासन जमा करणे बंधनकारक राहील.

७) अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्यास सदर परवानगी रदद करण्यात येईल.

८) सदर जमीनीचे मालकी हक्क/ हस्तांतरणाबाबत भविष्यात न्यायालयीन /कायदेशीर बाब उदभवल्यास त्याच्या निराकरणाची सर्वस्वी जबाबदारी योजनाधारक /विकसक यांचेवर बंधनकारक राहिल.



Scanned with CamScanner

९) शासनाचे नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक नाजक २०१८ /प्र.क्र.५१/नाजकधा-१ दिनांक ०१/०८/२०१९ मधील अटी व शर्ती अर्जदार/ विकसक यांचेवर बंधनकारक राहतील .

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,**
**पुणे नागरीसमूह, पुणे**

प्रत :- १) मा प्रधान सचिव नगर विकास विभाग नाजकधा-२ मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२) मुख्याधिकारी नगर परीषद तळेगाव दाभाडे यांनी शासन निर्णय क्रमांक नाजक-२०१८/प्र.क्र.५१/नाजकधा-१ दिनांक ०१/०८/२०१९ नुसार कार्यवाही करावी.

३) तहसिलदार वडगाव मावळ/नगर भुमापन अधिकारी वडगाव मावळ यांनी शासन निर्णय क्रमांक नाजक-२०१८/प्र.क्र.५१/नाजकधा-१ दिनांक ०१/०८/२०१९ नुसार कार्यवाही करावी.

४) द्वारका को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी तर्फे श्री. गणेश मोहनराव काकडे रा. ११३५ काकडे हाउस इंद्रायणी कॉलनी तळेगाव दाभाडे ता. मावळ, जि. पुणे.

2 Copy Recived

17/02/2020

Scanned with CamScanner